**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

नौपाडा प्रभाग समिती कार्यालय,
दिनांक :- २५.०८.२०१०

मा.नौपाडा प्रभाग समिती सभा
सभा सूचना क्र. ४, दिनांक :- २५.०८.२०१०
सभा क्र. १, दिनांक :- १.०९.२०१०

प्रति,
सन्मा.श्री/श्रीमती ____________________
सदस्य / सदस्या, नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीची सभा बुधवार, दि. १.०९.२०१० रोजी सकाळी ११.०० वा. मा.नौपाडा प्रभाग समिती कार्यालय येथील ''कै.मो.दा.जोशी सभागृह'' येथे सभा सूचना क्र. ०४, दि. २५.०८.२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयावर विचार-विनिमय करण्यांसाठी आयोजित करण्यांत येत आहे.

कृपया सदर सभेस आपण उपस्थित राहावे, ही विनंती.

(ज्ञानदेव सा. वाघुले)
प्रभाग अधिकारी / सचिव,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सभा सूचना क्र. ०४, दिनांक २५.०८.२०१० ची विषयपत्रिका.

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| २८ | ठाणे महानगरपालिकेच्या मा. नौपाडा प्रभाग समितीच्या दि. २८/०७/१० रोजी झालेल्या सभांचे इतिवृत्तांत कायम करण्याबाबत. |
| २९ | नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ६६ मध्ये प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत नौपाडा प्रभाग समितीचे प्र.क्र. ६६ मध्ये मलःनिस्सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे व किरकोळ कामे करणे व साफसफाई करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ३० | नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ५९ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत नागसेननगर येथिल ठामपाच्या गांवदेवी पुनर्वसन वसाहतीमधील चाळीमध्ये विविध स्थापत्य कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |

सचिव कार्यालय,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
दिनांक :- २५.०८.२०१०

(ज्ञानदेव सा. वाघुले)
प्रभाग अधिकारी/सचिव,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**मा.अध्यक्ष महोदया, यांच्या पूर्व परवानगीने घेण्यांत येणारी आयत्यावेळेची प्रकरणे**

| आ.वे. प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ३१ | प्र.क्र.६६ मध्ये शुभंकरोती सोसायटी समोर गटार पायवाट व कल्व्हर्ट बनविणे. |
| ३२ | प्र.क्र.६६ मध्ये माँ भवानी सोसायटी जवळील सर्व्हीस रोड लगत फुटपाथ व गटार नुतनीकरण करणे. |
| ३३ | प्र.क्र.६६ मध्ये रामवाडी येथे पायवाट बनविणे व सारस्वत बँक समोरील पदपथ नुतनीकरण करणे. |
| ३४ | प्र.क्र.६६ मध्ये भास्कर कॉलनी येथील निळकंठ इमारत ते देवदास सोसा. पर्यंत पदपथ नुतनीकरण करणे. |
| ३५ | प्र.क्र.६६ मध्ये चौथी सेठ तबेल्याच्या गल्लीमध्ये गटार पायवाट नुतनीकरण करणे. |
| ३६ | प्र.क्र.६६ विविध ठिकाणी नागरिकांना बसण्यासाठी बेचेंस बसविणे. |
| ३७ | प्र.क्र.६६ मध्ये प्रशांत नगर शिवसेना शाखेसमोर पेव्हर बसविणे. |
| ३८ | प्र.क्र.६९ मधील काजुवाडी येथील गुरुकृपा हौ.सोसा. चाळ परिसरात लॅकर कोटेड टाईल्स बसविणे व कॉंक्रिटीकरण करणे. |

## ठाणे महानगरपालिका,ठाणे

नौपाडा प्रभाग समिती.
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक - १.९.२०१०

**मा.नौपाडा प्रभाग समिती सभा**
**सभा सुचना क्रमांक ४ दि.२५.८.२०१०**
**सभा क्र.१ दि.१.९.२०१०**

ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समितीची सभा बुधवार दि.१.९.२०१० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता नौपाडा प्रभाग समिती कार्यालयातील कै.मो.दा.जोशी सभागृहात सभा सुचना क्र.४ दि.२५.८.२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यांत आलेली होती. सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा.सौ.सुहासिनी सुनिल लोखंडे हया उपस्थित होत्या.

सभेस उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | सौ.सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे | अध्यक्षा |
| २. | श्री.नारायण शंकर पवार | सदस्य |
| ३. | सौ.स्मिता मधुकर देशमुख | सदस्या |
| ४. | सौ.सुजाता भास्कर पाटील | सदस्या |
| ५. | सौ.अनिता हिराकांत फर्डे | सदस्सा |
| ६. | श्री.महादिप उर्फ मुन्ना बिष्ट | सदस्य |
| ७. | श्री.मुकुंद रामचंद्र जाधव | स्विकृत सदस्य |
| ८. | श्री.प्रकाश धोंडू पायरे | स्विकृत सदस्य |

सभेस गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.संजय संतु वाघुले | सदस्य |
| २. | श्री.अशोक बारकु वैती | सदस्य |
| ३. | श्री.विलास शिवराम सामंत | सदस्य |
| ४. | सौ.शांता शामजी सोलंकी | सदस्या |
| ५. | श्री.पुंडलिक मारुती थोरवे | सदस्य |

सभा ठिक ११.०० वाजता सुरु होते.

**मा.प्रभाग अधिकारी श्री.ज्ञानदेव वाघुले.**

(विषयपत्रिका वाचुन दाखवितात)

**श्री.मुकुंद रामचंद्र जाधव**

मा.अध्यक्षा महोदया, नौपाडा प्रभाग समितीमध्ये सन २००९ ते मार्च २०१०पर्यंत धोकादायक इमारती किती तोडण्यात आल्या ? त्या कोणाकडून तोडण्यांत आल्या, तसेच तोडण्यांत आलेल्या इमारतींची रक्कम भरुन कोणाकडून व कशाप्रकारे वसुल करण्यांत आली, याची माहिती मिळण्याबाबतचे पत्र मी संबंधीत विभागाकडे दिले आहे. तरी त्याबाबतची माहिती मिळावी.

**मा.प्रभाग अधिकारी श्री.ज्ञानदेव वाघुले.**

मा.अध्यक्षा महोदया, सदर प्रकरणी एक आठवडयाची मुदत देण्यांत यावी, आपणांस एका आठवडयात त्याबाबतची माहिती देण्यांत येईल.

**श्री.मुकुंद रामचंद्र जाधव**

मा.अध्यक्षा महोदया, प्रभागात ठिकठिकाणी पावसामुळे सर्वत्र पाणी साचते, प्रभागात कोणकोणत्या ठिकाणी पावसाळयात पाणी साठते, त्याची पहाणी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्यांस सांगितले होते. आपण पहाणी केली का ?

**मा.उप-अभियंता,श्री.बहीरम.**

मा.अध्यक्षा महोदया, याबाबत प्रभागातील टायटन शो रुम ते तीन हात नाक्यापर्यंत पहाणी करण्यांत आली असुन, संबंधीतांकडे त्याबाबतचा अहवाल सादर करण्यांत आलेला आहे.

**मा.सहाय्यक आयुक्त श्री.मनिष जोशी**

(मा.सहाय्यक आयुक्त सो. संबंधीत विभागाच्या अधिका-यांना सांगतात) आपण जो काही अहवाल तयार करुन सादर केलेला आहे, तो अहवाल सन्मा.सदस्यांना दाखवा.

**सौ.सुजाता भास्कर पाटील**

मा.अध्यक्षा महोदया, माझ्या प्रभागातील टेलिफोन एक्सचेंज येथील परिसरात रस्त्यावर अनेक खड्डे पडलेले आहेत, त्यामुळे तेथील नागरीकांना तसेच वाहनांना रहदारी करणे त्रासाचे होत आहे. तरी याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.उप-अभियंता,श्री.बहीरम.**

मा.अध्यक्षा महोदया, त्याबाबतची कार्यवाही करतो.

**श्री.नारायण पवार**

मा.अध्यक्षा महोदया, सन्मा.सदस्य श्री.जाधव सो यांनी प्रश्न उपस्थित केला आहे कि, नौपाडा प्रभाग समितीमध्ये धोकादायक इमारती किती तोडल्या, संबंधीतांकडून त्याबाबतचे पैसे भरुन वसुल केले जातात किंवा कसे ? त्याबाबतची माहिती सन्मा.सदस्यांना द्यावी. या शहरातील धोकादायक इमारतींबाबत आम्ही भरपूर चर्चा केलेली आहे. आपण सार्वजनिक बांधकाम विभाग, अतिक्रमण विभाग, शहर विकास विभाग या विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना त्याबाबतच्या कारवाईसाठी पाठविले जाते, त्यामुळे इतर अंतर्गत विकास कामांवर त्याचा परिणाम झालेला आहे. ज्यावेळी धोकादायक इमारतींच्या तोडकामाला माणसे पाठवली जातात, तो कर्मचारीवर्ग सर्व महापालिकेच्या संबंधीत विभागाकडून पाठविण्यात येतो का ?

**मा.सहाय्यक आयुक्त,श्री.मनिष जोशी**

मा.अध्यक्षा महोदया, नाही. त्या कामासाठी प्रायव्हेट माणसे घेतली जातात.

**श्री.नारायण पवार**

मा.अध्यक्षा महोदया, ज्या धोकादायक इमारती तसेच अनधिकृत इमारती तोडण्यांत येतात, त्या कामांकरीता ठेकेदारांकडून एकुण किती माणसे घेतली जातात, याबाबतची सविस्तर माहिती आपल्याजवळ असायला पाहिजे. कारण नवी मुंबई येथील काही ठेकेदार, अधिकारी तसेच नगरसेवक यांच्यावर आरोप करण्यांत आले आहेत कि, ठेकेदाराने बोगस माणसे, मशिनरी दाखवून काम केले. अशा काही तक्रारी संबंधीतांकडे आल्यानंतर त्याची चौकशी झाली आणि तेथे त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले. आपल्या नौपाडा प्रभाग समितीबाबत तसे होऊ नये. ज्या ठकेदाराला कॉन्ट्रक्ट देण्यांत येते त्या ठेकदाराची माणसे एकुण किती आहेत, त्यांचे नाव, पत्ता, फोटो तसेच ज्या ठेकेदाराकडे कामाची एजन्सी आहे, ती रजिस्टर आहे का ? याबाबतच्या सविस्तर माहितीची नोंद आपल्याकडे असायला पाहिजे. अनधिकृत बांधकाम तोडताना किंवा धोकादायक इमारतीचे तोडकाम करताना एखादया व्यक्तिला मार लागला, अशा वेळी त्या व्यक्तीची संपुर्ण माहिती आपल्याकडे असणे आवश्यक आहे. जी धोकादायक इमारत तोडण्यात येते, त्यावेळी येणारा खर्च हा त्या इमारत मालकाकडून कि बिल्डरकडून

वसुल केला जातो, तसेच अनधिकृत बांधकाम ज्यावेळी तोडण्यात येते त्यावेळी ते पैसे कोणाकडून वसुल केले जातात याची माहिती पुढील सभेला तसेच लेखी स्वरुपात सन्मा.सदस्यांना देण्यांत यावी.

सन्मा.सदस्या सौ.पाटील मॅडम यांनी रस्त्यातील खड्डे बुजविणेंबाबत संबंधित अधिका-यांना सांगितले आहे, उद्या गोकुळ अष्टमीचा सण असुन, या सणासाठी ठाणे शहरात येणारी गोविंदा पथके, तसेच सणानिमित्त येणारे नागरीक, दहीहंडी बघण्यासाठी आजुबाजूच्या परिसरातून येणा-या नागरीकांना अशा रस्त्यावरुन चालताना त्रास होणार आहे. आपण तहान लागली कि विहिर खणायला जातो. आपली कामे कधीच वेळेवर होत नाहीत. शहरात डेंग्यु, मलेरिया गॅस्ट्रोसारखी रोगराई पसरली कि, आपण फवारणी करतो. आणि त्यावेळी फवारणी करण्यांत आलेली औषधे कशी असतात हे ही आम्हाला माहित आहे. जर आपल्याला माहित आहे रस्त्यांना दरवर्षी खड्डे पडतात, दरवर्षी रस्ते बुजवायचे काम आपण करतो. तर पाऊस पडण्याअगोदर मे महिन्यात आपण खड्डे का बुजवू शकत नाही. त्याआधी ५-७ दिवसांची नोटीस देऊन आपण त्या कामांचे टेंडर का मागवू शकत नाही. आपण अशा प्रकारे टेंडर मागवायला पाहीजे. रस्त्यावरील खड्डे छोटे-छोटे असतात, खड्डे छोटे असताना पॅच मारला नाहीतर तो खड्डा मोठा होतो. ठेकेदारांना काम दिले कि तो खड्डा कसा भरायचा त्याना माहित असते, ते त्यांच्या पध्दतीने कसेतरी काम करुन टाकतात, त्या केलेल्या कामाकडे लक्ष दिले जात नाही आणि त्या कामाचे बिल दयायला आमचे जे.ई. असतातच. बील कसे बनवायचे त्यांना माहित असते. सगळेच अधिकारी असे आहेत असे म्हणता येणार नाही. ठेकेदाराने केलेले काम बघायचे नाही. काम केलेल्या जागेवर जाऊन पहाणी करायची नाही. केबीनमध्ये बसुन फाईल बनवून त्या कामाची बिले बनवुन ठेकेदारांना बिले दयायची. ठेकेदाराने केलेल्या अशा कामाचा त्रास नागरीकांना होतो, त्या प्रभागाचे नगरसेवक म्हणुन नागरीक आम्हाला विचारतात, अधिका-यांना विचारत नाहीत. शहरात असा एकतरी रस्ता दाखवा कि,त्या रस्त्यावर खड्डे पडलेले नाहीत. ठाणे महानगरपालिकेतर्फे यापुर्वी दर गुरुवारी कामांबाबतचे मुल्यमापन होत असे.

**मा.सहाय्यक आयुक्त श्री.मनिष जोशी**

मा.अध्यक्षा महोदया, कामाचे मुल्यमापन मागेच बंद करण्यात आले आहे.

**श्री.नारायण पवार**

मा.अध्यक्षा महोदया, त्याबाबत मी मागेच सांगितले होते की, ते मुल्यमापन बंद करा, त्यातून निष्पन्न काही होत नाही. आता परत ते चालू केले आहे का ?

**मा.सहाय्यक आयुक्त श्री.मनिष जोशी**

मा.अध्यक्षा महोदया, अजुनपर्यंत त्याबाबतचे आदेश आलेले नाही.

**श्री.नारायण पवार**

मा.अध्यक्षा महोदया, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग या विभागाकडील जे.ई यांनी प्रभागात जाऊन प्रभागवाईज पहाणी केली पाहिजे. प्रभागात कुठे पाणी साचते, रस्त्यांवर कुठे खड्डे पडले आहेत, कुठे गटार तुटले, चोकअप आहे, कुठे कचरा पडलेला आहे, कुठे लाईट गेली आहे, याची पहाणी करुन त्याबाबतच्या अडचणी बघून कार्यवाही केली पाहिजे. जे.ई. दिवसभर काय काम करतात, कुठे कुठे कामासाठी जातात याची नोंद संबंधीत विभागांनी ठेवायला हवी. माझ्या प्रभागातील एका ठिकाणी गटारातून पाण्याचा निचरा होत नव्हता, अशा ज्या वेळी समस्या उद्भवतात तेव्हा आम्हाला स्वतःला त्या ठिकाणी जावे लागते. ज्यावेळी गटारे बनविली जातात त्यावेळी गटारांची बांधकामे झाल्यानंतर त्याची पहाणी करणे जरुरीचे असते, त्या गटारांची लेवल बघितली जात नाही. त्या ठेकेदारांना बील मात्र आपण देत असतो. गटारे बांधल्यानंतर त्याची पहाणी करणे आवश्यक आहे. प्रभागातील रस्त्यांची पहाणी करुन जेथे रस्त्याला खड्डे पडलेले आहेत त्या रस्त्यांचे खड्डे भरण्याबाबत तसेच विद्युतबाबतच्या अडचणी बघुन त्याप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे. ही त्या संबंधीत अधिका-यांची जबाबदारी आहे ना ?

मा.अध्यक्षा महोदया, आपत्तकालीन कक्ष आपल्याकडे उघडण्यात आला आहे, माझ्या प्रभागातील टेकडी बंगला या परिसरातील सोसायटीची पुर्ण भिंत तेथील गटारावर पडली आहे. याबाबत मी वारंवार तक्रार करतोय, पण त्या ठिकाणी कोणी पहाणी करायला तेथे जात नाही. आपल्या चुकीमुळे ती भिंत पडली. त्याबाबत कार्यवाही करण्यास सांगण्यात आले होते. आपण तातडीच्या कामासाठी आपत्तकालीन कक्ष उघडला आहे आपत्तकालीन निधी असेल ना.

**मा.सहाय्यक आयुक्त श्री.मनिष जोशी**

मा.अध्यक्षा महोदया, सन्मा.सदस्य सो. यांनी चांगला मुद्दा उपस्थित केला आहे, दोन वर्षासाठी आपत्तकालीन खर्चासाठी रक्कम रुपये पन्नास हजार मिळायचे, परंतु प्रभाग समितीस्तरावर यावर्षी निधी मिळालेला नाही.

**श्री.नारायण पवार**

मा.अध्यक्षा महोदया, आपत्तकालीन निधी तातडीच्या कामासाठी ठेवतो, आपत्ती आली कि तो निधी त्यासाठी वापरण्यात येतो. आणि त्यासाठी आपत्तकालीन निधी ठेवलेला नाही ? आपल्या चुकीने गटारावर भिंत पडली असून, आजही ती भिंत तशीच पडून आहे. तेथील नागरीकांच्या माझ्याकडे वारंवार तक्रारी येत आहेत. याबाबत आपत्तकालीन निधी मिळण्याबाबतचा रिपोर्ट तयार करुन संबंधीतांना पाठवून दया. मा.अध्यक्षा महोदया, आजच्या सभेत याचे उत्तर दयायला संबंधीत अधिकारी नसतील तर आजची सभा तहकुब करावी.

**मा.अध्यक्षा**

संबंधीत अधिकारी मा.आयुक्त सो.यांच्याकडे सभेला गेले आहेत.

**श्री.नारायण पवार**

मा.अध्यक्षा महोदया, वारंवार आम्ही तक्रार करायची, परंतु त्याबाबत कार्यवाही होत नाही. तुम्ही त्याबाबत काय कार्यवाही करणार ते मला आत्ता इथे सांगा, तेथील नागरीकांचे बोल आम्ही सतत ऐकायचे. तसेच त्या पडलेल्या भिंतीमुळे तेथील गटार बंद झालेले आहे. त्यामुळे तेथे दुर्गंधी पसरली असुन, लोकांच्या आरोग्यास ते अपायकारक आहे. तीन महिन्यापुर्वी म्हणजे पहिला पाऊस पडला त्यावेळी ती भिंत पडली आहे.

मा.अध्यक्षा महोदया, आपण आपत्तकालीन कक्ष म्हणतो, पण पाऊस जास्त पडलातर आज त्या विभागाकडे अशा वेळी पारय, फावडे, घमेल, टिकावं नाही, साठलेल पाणी काढण्यासाठी पंप नाही. आवश्यकती साधनसामुग्री नाही. (सभागृहात संबंधीत अधिकारी श्री.नितीन पवार सो. येतात.) श्री.पवार साहेब माझ्या प्रभागातील भिंत पडल्याबाबत मी सतत आपल्याकडे तक्रार केली, माझ्या प्रभागातील सोसायटीची भिंत त्या गटारावर पडून गटार बंद झाल्याचे तुम्हाला सतत सांगुन देखील त्या कामाची फाईल बनवून का पाठविण्यांत आली नाही ? याचे नागरीकांना मी काय उत्तर देऊ.

**मा.कार्यकारी अभियंता, श्री.नितीन पवार**

मा.अध्यक्षा महोदया, सदर कामाचा प्रस्ताव पाठविण्यांत आलेला आहे. त्यासाठी बजेट नसल्याने, संबंधीत विभागाकडे त्याचे बजेट बनवून पाठवून देतो.

**श्री.नारायण पवार**

आपत्तकालीनचे बजेट बनवुन ती फाईल तयार करा, त्या कामात काही अडचणी येत असतील तर मला सांगा, प्रकरण तर पुढे पाठवा.

**मा.कार्यकारी अभियंता, श्री.नितीन पवार**

त्याबाबतचा प्रस्ताव मंजुर झाला कि मी सांगतो.

**श्री.नारायण पवार**

मा.अध्यक्षा महोदया, माझ्या प्रभागातल तीन पॅट्रोल पंप येथील गटारातून पुर्ण रस्त्यावर पाणी वहाते. गटारातील पाण्याचा निचरा व्यवस्थीतरित्या होत नाही.

**मा.कार्यकारी अभियंता, श्री.नितीन पवार**

मा.अध्यक्षा महोदया, तेथील गटारे गेल्या वर्षी बांधलेली आहेत. जी गटारे चोकअप झालेली आहेत. ती आरोग्य विभागाने गटारे साफ करायची असतात.

**श्री.नारायण पवार**

मा.अध्यक्षा महोदया, ठेकेदार कामगारांमार्फत काम करुन घेतो. नविन गटार बांधल्यानंतर त्या गटारांवर स्लॅप पडण्याऐवजी त्याचे ते मटेरीयल गटारावर पडलेल असते. अशा प्रकारची दहा गटारे मी तुम्हाला तेथे नेऊन दाखवतो. त्याबाबतची दक्षता का घेतली जात नाही ? तुम्ही माझ्या सोबत चला. त्या गटारात त्या ठेकेदाराचे मटेरियल, मोठमोठे दगड

तेथे तसेच पडलेले असतात. मी ते गटार तुम्हाला उघडून दाखवतो, मी जे बोलतो ते बघुन बोलतो. किती वर्षापासून तेथे ते मटेरीयल पडून आहे.

**मा.कार्यकारी अभियंता, श्री.नितीन पवार**

मा.अध्यक्षा महोदया, त्यावर आपण स्लॅप टाकलेला असणार, त्यावर झाकण असेल. एखादया ठिकाणी तसे राहिले असेल. तुम्ही ते दाखवा आम्ही ते काम करुन घेऊ.

**श्री.नारायण पवार**

मा.अध्यक्षा महोदया, आम्ही नगरसेवक बांधकामासंदर्भात इंजिनिअर किंवा तज्ञ नाही. आम्ही बघितल्यावर सांगु शकतो कि, हया बाजूने, येथून पाणी जाणार नाही. अनेक वेळा तुम्हाला सांगितले आहे. तुम्ही कोणी ऐकत नाही. आमच्यातील सन्मा.सदस्यांनी विनंती केल्यामुळे मी जास्त बोलत नाही. गटाराचे पाणी येणार इथून आणि तुम्ही स्लोप देणार त्या बाजूनें हे चुकीचे आहे ना. तुम्हाला त्या गटाराची लेवल मिळाली नाही.

**मा.कार्यकारी अभियंता, श्री.नितीन पवार**

मा.अध्यक्षा महोदया, आम्ही सहा इंचाची लेवल मिळालेली तुम्हाला दाखवली.

**श्री.नारायण पवार**

मा.अध्यक्षा महोदया, एखादया माणसाचे चित्र काढल्यावर त्या माणसाच्या चित्रात कान, नाक, डोळे, मान, हात नसतील तर तो माणुस म्हणुन दिसेल का ? त्याप्रमाणे ते गटार आहे. तुम्ही ते गटार जाऊन बघा. समोरचे गटार बरोबर आहे, पण साईटच्या गटाराची अवस्था बघा. त्या गटारातून पाणी जाते का ते बघा. त्या कामाची १४ लाखाची फाईल बनवली. ज्या वेळेस ठेकेदार गटाराचे काम करतो, त्यावेळेस एम.एम.ई.बी. च्या लाईन, पाण्याच्या पाईप लाईन कुठून गेल्या आहेत ते बघणे त्यांची जबाबदारी आहे ना. ते काम करताना तिथे असलेला पाईप तसाच आणि त्यावर स्लॅप टाकलेला. हे बघणार कोण, ही नगरसेवकांची जबाबदारी आहे का ? रात्री १- दिड वाजता रस्त्याचे डांबरीकरण चालू असताना आम्ही २-३ ठिकाणी गेलो होतो. एका ठिकाणी कामगार काम करीत होता. त्यावेळी त्या कामगाराला विचारले तुमचे सुपरवायझर कुठे आहेत, त्या कामगाराने सांगितले, सुपरवायझर येऊन गेले, त्यानंतर आम्ही विचारले, महानगरपालिकेचे अधिकारी कुठे आहेत विचारले तर त्याने सांगितले कि, ते अधिकारी दुपारी येऊन गेले. आता ते येणार नाहीत. मी विचारले आणखी दुसरं इथे कोण आहे, त्या कामगाराने सांगितले मीच आहे, मी त्याला विचारले आप कौन है, त्याने सांगितले मी कामगार आहे. मी विचारले आप ये बना सकते है, त्या कामगाराने सांगितले हा साब, ये काम मै कर सकता हुं. कामगार काम करतात, ते काम बघणार कोण ?

ज्यावेळी एखादा खड्डा भरला जातो त्यावेळी त्या खड्डयाला आकार दिला जात नाही. तो खड्डा साफ करुन त्याला आकार देऊन त्या खड्डयाला पॅच मारला तर खड्डा व्यवस्थीत भरला जातो, पण त्या खड्डयाला वाटेल तसा पॅच मारला जातो आणि मग त्याचा डिव्हायडर तयार होतो. रस्त्याला लेवल नाही. ठेकेदारांनी केलेल्या कामाची पहाणी करणे, एवढीतरी जबाबदारी महापालिकेंने घ्यावी. त्या ठेकेदारांना महापालिका पैसे देते. त्याच्याकडून फुकट काम करुन घेत नाही. तो पैसा जनतेचा आहे. ज्या ठेकेदाराला आपण काम देतोय, तो ठेकेदार दिलेले काम व्यवस्थीत करेल. हे विचारात घ्यायला हवे. मागे जसे टी.चंद्रशेखर सो.असताना एकात्मिक योजना राबवून ४०,६०,८०,१०० फुट अशा प्रकारे रस्ते तयार करण्यात आले, मला वाटते, अशा पध्दतीने एकात्मिक योजनेतून गटारे बनवली पाहिजेत. त्याची लेवल पाहिली पाहिजे, ती लेवल बघितली जात नाही. गटार हे गटारच असले पाहिजे, त्यावर फुटपाथ नको. एखादया गटारावर फुटपाथ असते हे कुठल्या नियमात आहे ते दाखवा. ठेकेदाराने गटारावर चेंबरचे काम कसे केले ते बघा, गटार साफ झाले नाही, तर आरोग्य विभागाच्या कामगारांना काय बोलणार ? त्या चेंबरमध्ये फावडे जाऊ शकणार नाही, अशा पध्दतीने चेंबर बांधून ठेवलेली आहे. तुम्हाला मागच्या वेळेस सांगितले होते, आमच्या परिसरात तीन आमदार रहातात, त्या ठिकाणावरील गटार संपुर्ण मातीने भरलेले आहे. मी स्वतः पैसे भरुन ते गटार साफ करुन घेतले. ही अशी परिस्थीती आहे. आम्ही वरचेवर हयाबाबत तक्रार करतोय, त्याबाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी महापाीलिकेची नाही का ? कामाचा दर्जा वाढवला तर आपल्याला बजेट व्यवस्थित पुरेल. अनेक ठिकाणी रस्त्यांना एवढे खड्डे पडलेत कि, गाडी चालवताना बोट चालते तशी त्या खड्डयांतुन गाडी चालते. अशी सर्व परिस्थीती आहे.

मा.अध्यक्षा महोदया, प्रत्येक प्रभागात जे.ई.नी प्रत्यक्ष जाऊन पहाणी केली पाहिजे. रस्त्यांची काय परिस्थीती आहे, कुठे गटार तुटले आहे, गटार कुठे तुंबले आहे, पाणी कुठे लिकेज झाले आहे, त्याबाबतची पहाणी करणे गरजेचे आहे. विद्युत विभागाकडील वेळेवर कोणी भेटत नाहीत. जशी गणपती उत्सवाला लाईटींग असते त्याप्रमाणे त्या केबल हया खांबावरुन त्या खांबावर हवेवर तरंगत असतात. इकडच्या तिकडे तिकडच्या इकडे अशा टाकलेल्या असतात. विद्युतच्या बॉक्सची परिस्थिती बघा, एखादया शाळकरी मुलाने त्या बॉक्सला हात लावला ना तर त्या मुलाला शॉक लागून त्याच्या जीवाला धोका होण्याची

शक्यता नाकारता येत नाही. त्याबाबतची काळजी घ्या. नुसते लाईटचे पोल लावू नका. लाईटचे पोल नविन बसवून त्याचे बजेट कसे संपवायचे ते माहित आहे. ज्यावेळी एखादया परिसरातील लाईट बंद आहेत असे आम्ही सांगतो त्यावेळी कार्यवाही करतात, आम्ही नगरसेवक सुपरवायझर आहोत का ? जे वार्षिक ठेकेदार नेमलेल आहेत ते काय काम करतात ? एखादया लाईटच्या पोलचा एखादा पार्ट बंद असेल, तो पार्ट दुरुस्त केल्यानंतर किती दिवस चालू राहिल याची माहिती पाहिजे. आज एखादा पोल दुरुस्त केला कि, दुस-या दिवशी तो पोल बंद. डुप्लिकेट पार्ट लावता का ? आता सणाचे दिवस असून, जे विद्युत दिवे बंद आहेत ते चालू करण्याबाबतची कार्यवाही करण्यांत यावी.

मा.अध्यक्षा महोदया, या शहरासाठी आपल्या डंपिंग ग्राऊंडची अजुन सोय होत नसल्याने, ७०० टन कचरा या शहरात पडलेला असतो. तो कचरा कुठे टाकायचा, त्या कच-याची विल्हेवाट कशी लावायची हा मोठा प्रश्न आहे. या शहराची अशी परिस्थिती आहे. शहरात अनेक ठिकाणी कचरा पडलेला असतो. मा.अध्यक्षा महोदया, अनेक विषयांवर चर्चा केली. वृक्ष प्राधिकरण विभागाचे अधिकारी आले आहेत का ?

**मा.अध्यक्षा**

वृक्ष प्राधिकरण विभागाचे कर्मचारी अधिकारी गोखले रोडला कार्यवाहीसाठी गेले आहेत.

**श्री.नारायण पवार**

तलाव पाळी येथील झाडयांच्या फांदया तोडण्याबाबत सांगितले होते, त्याबाबतची कार्यवाही करण्यांत आली का?

**मा.सहाय्यक आयुक्त श्री.मनिष जोशी**

मा.अध्यक्षा महोदया, झाडांच्या फांदया तोडण्यात आलेल्या आहेत, परंतु त्या उचललेल्या नाहीत.त्याबाबतची कार्यवाही करतो.

**श्री.नारायण पवार**

मा.अध्यक्षा महोदया, गणपती उत्सव जवळ आलेला आहे, नागरीकांना तेथुन चालताना त्रास होत होता. ती तोडण्यात आलेली झाडे लवकरात लवकर उचलण्यात यावीत. संबंधीत विभागाने ठाणे शहर स्वच्छ व सुंदर होण्याच्यादृष्टीने फुलांची, शोभेची झाडे लावण्याबाबत कार्यवाही केली पाहिजे.

**सौ.स्मिता मधुकर देशमुख**

मा.अध्यक्षा महोदया, कृष्णधाम सोसायटीच्या बाजुला दोन बंगले आहेत, आत एक गोकुळ नर्सरी आहे, तेथे नर्सरीत येणा-या लहान मुलांची ये-जा चालू असते. नर्सरी चालवतात त्यांनी तक्रार केली आहे, तेथील गटाराचे झाकण त्या गटारात पडले आहे. तसेच पसायदान समोरील रोडवर असलेल्या गटारांवर झाकणे टाकण्याबाबतची लवकरात लवकर कार्यवाही करण्यांत यावी. आणि संत ज्ञानेश्वर देवळासमोरील रस्त्यांवर खड्डे पडले आहेत त्याबाबतची कार्यवाही करण्यांत यावी. हे काम गणपती येण्यापुर्वी होईल का ?

**मा.कार्यकारी अभियंता, श्री.नितीन पवार**

मा.अध्यक्षा महोदया, रस्त्यांचे खड्डे भरणेसाठी डांबर मागविलेला आहे, दोन दिवसांत खड्डे भरुन ते कव्हर करण्याची कार्यवाही करतो. नर्सरी येथील तक्रारीबाबतची कार्यवाही आज संध्याकाळी करतो. दोन दिवसांत गटारांवर झाकणे बसविण्याबाबतची कार्यवाही करतो.

**श्री.मुकुंद जाधव**

मा.अध्यक्षा महोदया, मा.श्री.पवार सो.कडून काढण्यांत आलेल्या आदेशासंदर्भात विचारायचे आहे कि, प्रभाग समिती जाहीर निवेदन करते की, घर विकू नका, अशा वेळी महापालिका त्या घरांना पाणी पुरवठा केला जातो का तसेच त्या घरांना टॅक्स आकारणी केली जाते का ?

**मा.सहाय्यक आयुक्त श्री.मनिष जोशी**

मा.अध्यक्षा महोदया, अनधिकृत बांधकाम झोपडपट्टीचे, लोडबेरिंगचे किंवा आर.सी.सी.नव्याने जे अनधिकृत बांधकाम झालेले आहे त्यांना टॅक्स आकारणी करतो. ज्या गेल्या एक वर्षात अनधिकृत आर.सी.सी इमारती झालेल्या आहेत, त्यांना पाणी पुरवठा करु नये असे किंवा होऊ नये, यादृष्टीने प्रशासन हा विषय गांभीर्याने घेत आहे. त्यासाठी पाणी पुरवठा विभागाचे

कर्मचारी त्यादृष्टीने पहाणी करीत आहेत. आणि त्यानंतर देखील पाणी पुरवठा घेतला असेल तर त्यांच्यावर केसेस करण्यात येतात. त्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

**श्री.प्रकाश धोंडू पायरे**

ठाणे वैभव वृत्तपत्रामध्ये मा.आयुक्त सो.यांनी अनधिकृत बांधकामाबाबतच्या कामासंदर्भात योग्य तो निर्णय घेऊन संबंधीतांवर कारवाई केल्याबाबत बातमी आली असुन, त्यांचे मी अभिनंदन करतो. प्रभागातील जिजामाता भाजी मंडई येथे ड्रेनेज असुन त्यातून वहाणारे पाणी जिकडे तिकडे वहात होते आणि तशा परिस्थितीत तेथे भाजीपाला विकला जात होता, लोक त्या ठिकाणी भाजी विकत घेत होते, असे असताना त्या लोकांना डेगुसारखे आजार का होणार नाहीत ? नागरीकांना चालण्यासाठी फुटपाथ बांधण्यात येतात, फुटपाथ बांधण्यासाठी लाखो रुपयांचा खर्च दाखविण्यात येतो. पण त्यावर टाकण्यात येणा-या पेव्हर ब्लॉक टिकत नाहीत, जर त्या टिकत नाहीत, तर मग त्या बसवता कशाला, जे काम केले जाते, त्याची गॅरंटी सांगा ना. सन्मा.सदस्य श्री.नारायण पवार सो. पोटतिडकीने बोलले. संबंधीत अधिकारी त्याबाबत लगेच उत्तर का देऊ शकत नाहीत. मलेरिया, डेंगु साथीचे रोगासाठी करण्यांत येणारी फवारणी तसेच ड्रेनेज बाबतची कामे कमी दर्जाची केलेली आहेत, त्यावर एक्शन घेतलेली नाही. तसेच रस्त्यांबाबत सांगायचे झालेतर, असा एक तरी रस्ता दाखवा कि तो खचलेला नाही. वर्तकनगरच्या हॉस्पिटलसारख्या ठिकाणी पाणी तुंबते, मलेरियाचे पेशंट का होणार नाहीत. त्याबाबत तात्काळ कार्यवाही होणे गरजेचे आहे, रामवाडी येथे खड्डा पडलेला आहे, तो खड्डा बुजविणेबाबत लवकरात कार्यवाही करण्यात यावी.

**मा.उप-अभियंता,श्री.बहीरम.**

मा.अध्यक्षा महोदया, त्याबाबतची कार्यवाही करतो

**श्री.प्रकाश धोंडू पायरे**

मा.अध्यक्षा महोदया, अधिका-यांवर ताशेरे ओढलेले मला आवडत नाही. सर्वच अधिकारी कुचकामी नाहीत. काही काम करणारेही चांगले अधिकारी आहेत. मला सांगायचे आहे कि, प्रत्येक प्रश्नाचा उहापोह केला पाहिजे. फुटपाथ खराब का होतात. काम बरोबर होत नाही, कि अधिकारी त्या कामांकडे लक्ष देत नाहीत. नौपाडा प्रभाग समितीत सर्वच जाणकार लोक आहे. परंतु ते काही बोलत नाहीत. विद्युत विभागाकडील कामगार कुठे असतात ? प्रत्येक वेळेस त्यांना फोन केला की ते धावत येतात. येत नाहीत असे म्हणत नाही. जे काम केलेले असते, त्याचे फिटींग लुज असते. एका पोलचे काम केल्यावर तो कमीत कमी एक महिनाभर तरी पोल चालू रहायला पाहिजे, याची दक्षता का घेत नाहीत. एका महिन्यात दोन वेळा पोलची तक्रार का येते ? ते काम कोण करतो, त्यांना सांगा ना. प्रत्येक ठिकाणी ठेकदार असतो, तो काम किती करतो ते आम्हाला माहीत नाही. एखादी फाईल आम्ही बघीतली कि सांगणार. त्या कामाची व्हॅल्यु किती, त्या कामाचा ठेका कोणाला दिला आहे, काम किती दिवसांत करणार ? प्रायव्हेट कंपनीकडून केलेली कामे ५-५ वर्षे टिकतात. आपण केलेले पेव्हर ब्लॉक का टिकत नाहीत. पवार सो.तुम्ही लक्ष दिलेतर ते नक्कीच टिकतील. आपण लक्ष का ठेवत नाही.मला कोणाला विरोध करायचा नाही. आम्हाला अपेक्षित आहे कि तुम्ही लक्ष ठेवायला हवे.

**मा.अध्यक्षा**

सन्मा.सदस्यांची नागरीकांच्या तसेच येण्या-जाण्याच्या रस्त्यांबाबतच्या समस्यांवर या ठिकाणी बरीच चर्चा झाली. सन्मा.सदस्यांची चर्चा फक्त ऐकुन न घेता त्याबाबतची उपाययोजना करा, पुन्हा पुन्हा तोच विषय बोलायला लावू नका. तसेच सन्मा.सदस्य श्री.पवार सो. यांनी एक मुद्दा उपस्थित केला कि, गटारे तुंबून रस्त्यावर वहाणा-या पाण्यामुळे रोगराई, आजार पसरतात. तेथील चेंबरमधुन पाणी का जात नाही. याबाबत संपुर्ण नौपाडा प्रभाग समितीतील चेंबर्सची पहाणी करण्यांत यावी. ब-याच ठिकाणी पाणी तुंबते, चेंबर माती, कचरा,विटांचा चुरा यांनी भरलेले आहे. त्याची पहाणी करायला पाहिजे. आम्ही सांगितल्यानंतर तुम्ही ते काम करणार हे योग्य नाही. प्रामुख्याने पावसाळयात तरी पहाणी करुन त्याबाबतची उपाययोजना करायला पाहिजे. पाऊस सुध्दा सतत चालू आहे. त्यामुळे पाणी साचते याबाबतची उपाययोजना करण्यांत यावी.

**मा.प्रभाग अधिकारी, श्री.ज्ञानदेव वाघुले**

(प्रकरण क्रमांक २८, २९, ३० वाचल्यानंतर आयत्यावेळेची प्रकरण क्रमांक ३१ ते ३८ वाचुन दाखवितात )

(सर्व प्रकरणे मंजुर करण्यात येतात. )

प्रकरण क्र. २८ ठाणे महानगरपालिकेच्या मा. नौपाडा प्रभाग समितीच्या दि. २८/०७/१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत कायम करणेबाबत.

## मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. ३१, दि. ०१.०९.२०१०

**ठराव** :-

ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीच्या दि. २८/०७/१० रोजी झालेल्या सभांचे इतिवृत्तांत ही समिती वाचून कायम करीत आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील अनुमोदक :- सौ. स्मिता देशमुख

सर्वानुमते मंजूर

सही/ सौ. सुहासिनी लोखंडे,
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

प्रकरण क्र. २९ नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ६६ मध्ये प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत मलःनिस्सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे व किरकोळ कामे करणे व साफसफाई करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

## मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. ३२, दि. ०१.०९.२०१०

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६६ मधील सन्मा.सदस्य सौ. सुजाता पाटील यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,०६,९००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.अधिक्षक अभियंता, सा.बां.विभाग, ठाणे यांनी शिफारस केलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,०६,९००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष सहा हजार नऊशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. स्मिता देशमुख अनुमोदक :- सौ. अनिता फर्डे

सर्वानुमते मंजूर

सही/ सौ. सुहासिनी लोखंडे,
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

प्रकरण क्र. ३० नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ५९ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत नागसेननगर येथिल ठामपाच्या गांवदेवी पुनर्वसन वसाहतीमधील चाळीमध्ये विविध स्थापत्य कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. ३३, दि. ०१.०९.२०१०**

**ठ रा व :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६० मधील सन्मा.सदस्य श्री. महदिप बिस्ट यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,९९,१००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं.मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,९९,१००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष नव्याण्णव हजार शंभर मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील अनुमोदक :- सौ. स्मिता देशमुख

सर्वानुमते मंजूर

सही/ सौ. सुहासिनी लोखंडे,
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.अध्यक्ष महोदया, यांच्या परवानगीने घेण्यात आलेला आयत्यावेळीचा विषय.

आ.वे.प्रकरण क्र.३१ नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ६६ मध्ये प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत शुभंकरोती सोसा. समोर गटार, पायवाट व कल्व्हर्ट बनविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. ३४, दि. ०१.०९.२०१०**

**ठ रा व :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६६ मधील सन्मा.सदस्य सौ. सुजाता भास्कर पाटील यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.३,२२,९००/- इतक्या

रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.अधिक्षक अभियंता, सा.बां.विभाग, ठाणे यांनी शिफारस केलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.३,२२,९००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लक्ष बावीस हजार नऊशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. स्मिता देशमुख अनुमोदक :- सौ. अनिता फर्डे

सर्वानुमते मंजूर

सही/ सौ. सुहासिनी लोखंडे,
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.अध्यक्ष महोदया, यांच्या परवानगीने घेण्यात आलेला आयत्यावेळीचा विषय.

आ.वे.प्रकरण क्र.३२ नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ६६ मध्ये प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत माँ भवानी सोसा. जवळील सर्व्हीस रोडलगत फुटपाथ व गटार नुतनीकरण करणेबाबत या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. ३५, दि. ०१.०९.२०१०**

**ठ रा व :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६६ मधील सन्मा.सदस्य सौ. सुजाता भास्कर पाटील यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.२,२९,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं.मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.२,२९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष एकोणतीस हजार मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. स्मिता देशमुख अनुमोदक :- सौ. अनिता फर्डे

सर्वानुमते मंजूर

सही/ सौ. सुहासिनी लोखंडे,
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.अध्यक्ष महोदया, यांच्या परवानगीने घेण्यात आलेला आयत्यावेळीचा विषय.

आ.वे.प्रकरण क्र.३३ नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ६६ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत रामवाडी येथे पायवाट बनविणे व सारस्वत बँकेसमोरील पदपथ नुतनीकरण करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. ३६, दि. ०१.०९.२०१०**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६६ मधील सन्मा.सदस्य सौ. सुजाता भास्कर पाटील यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,९७,५००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.अधिक्षक अभियंता, सा.बां.विभाग, ठाणे यांनी शिफारस केलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,९७,५००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष सत्त्याण्णव हजार पाचशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. स्मिता देशमुख
अनुमोदक :- सौ. अनिता फर्डे

सर्वानुमते मंजूर

सही/ सौ. सुहासिनी लोखंडे,
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.अध्यक्ष महोदया, यांच्या परवानगीने घेण्यात आलेला आयत्यावेळीचा विषय.

आ.वे.प्रकरण क्र.३४ नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ६६ मध्ये नगर सेवक निधी अंतर्गत भास्कर कॉलनी येथील निळकंठ इमारत ते देवदत्त सोसायटीपर्यंत पदपथ नुतनीकरण करणेबाबत या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. ३७, दि. ०१.०९.२०१०**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६६ मधील सन्मा.सदस्य सौ. सुजाता भास्कर पाटील यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,९८,५००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं.मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,९८,५००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष अठ्ठयाणव हजार पाचशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. स्मिता देशमुख अनुमोदक :- सौ. अनिता फर्डे

सर्वानुमते मंजूर

सही/ सौ. सुहासिनी लोखंडे,
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.अध्यक्ष महोदया, यांच्या परवानगीने घेण्यात आलेला आयत्यावेळीचा विषय.

आ.वे.प्रकरण क्र.३५ नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ६६ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत चौथी सेठ तबेल्याच्या गल्लीमध्ये गटार व पायवाट नुतनीकरण करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. ३८, दि. ०१.०९.२०१०**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६६ मधील सन्मा.सदस्य सौ. सुजाता भास्कर पाटील यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,९७,३००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.अधिक्षक अभियंता, सा.बां.विभाग, ठाणे यांनी शिफारस केलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,९७,३००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष सत्त्याणव हजार तीनशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. स्मिता देशमुख — अनुमोदक :- सौ. अनिता फर्डे

सर्वानुमते मंजूर

सही/ सौ. सुहासिनी लोखंडे,
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.अध्यक्ष महोदया, यांच्या परवानगीने घेण्यात आलेला आयत्यावेळीचा विषय.

आ.वे.प्रकरण क्र.३६ नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ६६ मध्ये नगर सेवक निधी अंतर्गत विविध ठिकाणी नागरिकांना बसण्यासाठी बेंचेस बसविणेबाबत या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. ३९, दि. ०१.०९.२०१०**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६६ मधील सन्मा.सदस्य सौ. सुजाता भास्कर पाटील यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,८७,७००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं.मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,८७,७००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष सत्त्याऐंशी हजार सातशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. स्मिता देशमुख अनुमोदक :- सौ. अनिता फर्डे

सर्वानुमते मंजूर

सही/ सौ. सुहासिनी लोखंडे,
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.अध्यक्ष महोदया, यांच्या परवानगीने घेण्यात आलेला आयत्यावेळीचा विषय.

आ.वे.प्रकरण क्र.३७ नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ६६ मध्ये नगर सेवक निधी अंतर्गत प्रशांत नगर शिवसेना शाखेसमोर पेव्हर बसविणेबाबत या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. ४०, दि. ०१.०९.२०१०**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६६ मधील सन्मा.सदस्य सौ. सुजाता भास्कर पाटील यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,६७,९००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं.मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,६७,९००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष सदुसष्ठ हजार नऊशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. स्मिता देशमुख अनुमोदक :- सौ. अनिता फर्डे

सर्वानुमते मंजूर

सही/ सौ. सुहासिनी लोखंडे,
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.अध्यक्ष महोदया, यांच्या परवानगीने घेण्यात आलेला आयत्यावेळीचा विषय.

आ.वे.प्रकरण क्र.३८ नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. ६९ मध्ये प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत काजुवाडी येथील गुरुकृपा हौ. सोसा. चाळ जवळील परिसरात लॅकर कोटेड टाईल्स बसविणे व कॉक्रीटीकरण करणेबाबत या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

### मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. ४१, दि. ०१.०९.२०१०

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६९ मधील सन्मा.सदस्य श्री. अशोक वैती यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.२,०४,८००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा. उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं.मार्फत करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.२,०४,८००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष चार हजार आठशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी, असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ. स्मिता देशमुख अनुमोदक :- सौ. अनिता फर्डे

सर्वानुमते मंजूर

सही/ सौ. सुहासिनी लोखंडे,
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

( अशा त-हेने साधक-बाधक चर्चा झाल्यानंतरमा.अध्यक्षा महोदया, सभा संपल्याचे दुपारी ठिक १.४५ वाजता जाहीर करतात. )

प्रभाग अधिकारी,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सचिव विभाग,
नौपाडा प्रभाग समिती.
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
सभा समाप्त - दुपारी ठिक १.४५ वाजता .
दिनांक - १.९.२०१०